admn23-24

महाराष्ट्र शासन
सत्यमेव जयते

**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER
कृषि परिषद

**ई-मेल :** edn_mcaer@rediffmail.com **संकेतस्थळ :** www.mcaer.org **दूरध्वनी (०२०) २५५२८६८८**

संदर्भः- १. कृषी परिषदेच्या दि.२२/९/२०२२ रोजीच्या १०८ व्या बैठकीतील ठराव क्र.०१/१०८/२०२२ दि.२२/०९/२०२२

२. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२२/२२०७, दि. ४/१०/२०२२

३. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२२/२२७७, दि. १३/१०/२०२२

४. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२२/१५६३, दि.९/६/२०२३

५. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२२/१५७४, दि.१२/६/२०२३

६. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२२/१५८२, दि.१३/६/२०२३

---------------------------------

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२२/१९४९ दि.१९ जुलै,२०२३

## परिपत्रक

**विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**
**खाजगी अनुदानित व विना अनुदानित महाविद्यालयांच्या प्रवेश क्षमतेबाबत.**

भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीने कृषी व संलग्न महाविद्यालये सुरु करण्यासाठी सुचविलेल्या शिफारशी चारही कृषी विद्यापीठांना लागू करण्यात आल्याने त्यापैकी प्रवेश क्षमतेविषयक शिफारस विचारात घेऊन खाजगी अनुदानित व विना अनुदानित ३९ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता वाढविण्यात आली होती. तथापि, या महाविद्यालयांकडे वाढीव प्रवेश क्षमतेकरिता पाचव्या अधिष्ठाता समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार आवश्यक त्या पायाभूत सोयी-सुविधा पुरेशा प्रमाणात आहेत किंवा कसे, याबाबत संबंधित कृषी विद्यापीठांकडून अहवाल प्राप्त होईपर्यंत सदरची प्रवेश क्षमता पूर्वीप्रमाणेच करण्याचे कृषी परिषदेच्या दि.२२/९/२०२२ रोजीच्या १०८ व्या बैठकीतील ठराव क्र.०१/१०८/२०२२ अन्वये निर्देश देण्यात आले. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ येथील दि. ४/१०/२०२२

च्या परित्रकान्वये निश्चित करण्यात आले होते. तथापि, त्यावेळी सन २०२२-२३ ची पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया चालू होती आणि सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये वाढीव प्रवेश क्षमता नमूद केलेली होती. काही महाविद्यालयांनी त्यांचेकडे सोयी-सुविधा उपलब्ध असल्याचे सांगून वाढीव प्रवेश क्षमतेनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत मागणी केली होती. सदर बाबी विचारात घेऊन संदर्भ क्र. २ येथील दि.४/१०/२०२२ रोजीच्या परिपत्रकास संदर्भ क्र. ३ येथील दि.१३/१०/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांच्या मान्यतेने तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती आणि सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया वाढीव प्रवेश क्षमतेनुसार राबविण्यात आली होती.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील पदवी प्रवेश प्रक्रियेकरिता चारही कृषी विद्यापीठांकडून ३९ महविद्यालयांचे मूल्यांकन अहवाल / प्रवेश प्रक्रियेकरिता वाढीव प्रवेश क्षमतेस पात्र असल्याचे संबंधित कृषी विद्यापीठांचे ना हरकत प्रमाणपत्र या कार्यालयास प्राप्त झालेले असल्यामुळे वाढीव प्रवेश क्षमतेनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यास हरकत नसल्याची बाब मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे मान्यतेस्तव सादर केली असता, त्यांनी प्रस्तावित मान्य, 'क' व 'ड' दर्जाप्राप्त महाविद्यालयांना पुढील प्रवेश प्रक्रियेच्या आत दर्जा सुधारणा करण्याच्या अटीवर मान्य, अन्यथा पुढील प्रवेश प्रक्रियेत मान्यता देता येणार नाही, असे आदेश दिलेले आहेत.

सदर आदेशानुसार परिशिष्ट 'अ' मधील महाविद्यालयांच यापूर्वी वाढविण्यात आलेली प्रवेश क्षमता कायम करण्यात येत असून त्यानुसार भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या पाचव्या अधिष्ठाता समितीच्या प्रवेश क्षमतेविषयक शिफारशीनुसार सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे ३९ खाजगी अनुदानित/ कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांची वाढीव प्रवेश क्षमता विचारात घेऊन सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

सदर महाविद्यालयांपैकी 'क' व 'ड' दर्जाप्राप्त महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापूर्वी 'अ' किंवा 'ब' दर्जा प्राप्त करावा अन्यथा सन २०२४-२५

या आगामी शैक्षणिक वर्षापासून अशा महाविद्यालयांमध्ये वाढीव प्रवेश क्षमतेनुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

संस्थात्मक कोटयातील पूर्ण / अंशतः जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकडे हस्तांतरित करु इच्छिणाऱ्या महाविद्यालयांना वाढीव प्रवेश क्षमतेनुसार हस्तांतरित करावयाच्या जागांमध्ये वाढ करावयाची असल्यास त्यांनी नियोजित वेळापत्रकानुसार दि. २०/०७/२०२३ पर्यंत जागा हस्तांतरित करावयाचे सुधारीत पत्र कृषी परिषद तसेच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांना ई-मेलद्वारे सादर करावे. सदर मुदतीनंतर प्राप्त होणारी पत्रे विचारात घेतली जाणार नाही, याचीही कृपया नोंद घ्यावी.

सोबत- परिशिष्ट ‘अ’

(रावसाहेब भागडे)
**महासंचालक**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठीः-

१. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
२. प्राचार्य, संदर्भीय परिपत्रकासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेली सर्व ३९ महाविद्यालये.
३. मे. विभास टेक्नॉलॉजीज, तिसरा मजला, पार्वतीनंदन, रॉयल पार्कसमोर, कोकणे चौक, शिवराज नगर, रहाटणी, पुणे.

    यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर शिक्षण विभागामध्ये उपलब्ध करून देण्यात यावे.
४. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.

प्रत माहितीस्तवः-

१. मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे खाजगी सचिव, मा.मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२
२. चेअरमन, असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंट्स ऑफ ॲग्रीकल्चर ॲण्ड ॲग्रीकल्चर अलाईड कॉलेजेस, अमृतधाम, पंचवटी, नाशिक ४२२ ००३.

admn23-24

कृषी परिषद कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४५२२/१९४९ दि. १९ जुलै,२०२३

## सोबतचे परिशिष्ट 'अ'

### कृषी विद्यापीठनिहाय वाढीव प्रवेश क्षमतेंतर्गत महाविद्यालयांची यादी

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | प्रवेश क्षमता | वाढीव प्रवेश क्षमता | होणारी वाढ | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|
| | **महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी** | | | | |
| १. | श्रीमंत शिवाजीराजे उद्यानविद्या महाविद्यालय, फलटन जि. सातारा | ८० | १२० | ४० | ब |
| २. | उद्यानविद्या महाविद्यालय, सोनसळ, हिंगणगाव, ता. कडेगाव, जि.सांगली | ४० | ६० | २० | ब |
| ३. | के. के. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, सरस्वतीनगर, मुंबई-आग्रा रोड, पंचवटी, नाशिक | ४० | ६० | २० | ब |
| ४. | एच. एच. श्री श्री मुरलीधर स्वामीजी उद्यानविद्या महाविद्यालय, मालेगाव, जि.नाशिक | ४० | ६० | २० | ब |
| ५. | श्रीराम उद्यानविद्या महाविद्यालय, मु.पो. पानीव ता.माळशिरस जि.सोलापूर | ४० | ६० | २० | ब |
| ६. | कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, चंद्रापूर रस्ता, आयटीआय फार्मसी कॅम्पस, मु.पो. लोणी बु., ता.राहाता जि अहमदनगर | ८० | १०० | २० | ब |
| ७. | के.के. वाघ कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, सरस्वतीनगर, मुंबई-आग्रा रोड, पंचवटी, नाशिक | ८० | १०० | २० | अ |
| ८. | लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, वडाळा, ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर | ४० | ५० | १० | ब |
| ९. | मॉडर्न कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कुळे-डखाने, पौड, ता.मुळशी जि. पुणे | ४० | ५० | १० | ड |
| १०. | कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, मु. मदडगाव, पो. भतोडी ता.जि.अहमदनगर | ८० | १०० | २० | ड |
| ११. | विद्या प्रतिष्ठान कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, विद्या प्रतिष्ठान जैवतंत्रज्ञान शाळा, विद्या नगरी, भिगवन रोड, बारामती, जि. पुणे | ४० | ५० | १० | अ |
| १२. | डॉ.डी.वाय.पाटील कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, आकुर्डी, पुणे ४११ ०४४. | ८० | १२० | ४० | क |
| १३. | कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, नारायणगांव ता. जुन्नर जि.पुणे ४१० ५०४. | ८० | १२० | ४० | ब |
| १४. | राजश्री छत्रपती शाहू महाराज कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, विलिंगडन कॉलेज कंपाऊंड, सांगली ४१६ ४१५. | ४० | ६० | २० | क |
| १५. | कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, चंदनापुरी घाट, गुंजाळवाडी, ता. संगमनेर, जि. अहमदनगर | ४० | ६० | २० | क |
| १६. | कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, लोणी, ता. राहाता, जि.अहमदनगर | ४० | ६० | २० | ब |

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | प्रवेश क्षमता | वाढीव प्रवेश क्षमता | होणारी वाढ | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|
| १७. | के. के. वाघ कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, सरस्वतीनगर, मुंबई-आग्रा रोड, पंचवटी, नाशिक | ४० | ६० | २० | ब |
| १८. | कृषी व्यवसाय व्यवस्थापन, मु. पो. वडाळा ता. उत्तर सोलापूर जि.सोलापूर | ४० | ६० | २० | क |
| १९. | कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मु.पो. शारदानगर, ता. बारामती जि. पुणे-४११०१५ | ४० | ६० | २० | अ |
| २०. | श्रीराम व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मु.पो. पानीव ता.माळशिरस जि.सोलापूर ४१३ ११३ | ४० | ६० | २० | क |
| | **डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला** | | | | |
| २१. | श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती (खाजगी परंतु शासन अनुदानित) | १५६ | १८० | २४ | निरंक |
| २२. | श्री शिवाजी उद्यानविद्या महाविद्यालय, अमरावती | ८० | १२० | ४० | क |
| २३. | स्वातंत्र्यवीर जी. आय. उद्यानविद्या महाविद्यालय, जळगांव जामोद, जि. बुलडाणा | ८० | १२० | ४० | ब |
| २४. | श्री शिवाजी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, अमरावती | ८० | १०० | २० | अ |
| २५. | विवेकानंद कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, विवेकानंद नगर, (हिवरा आश्रम) ता. मेहकर जि.बुलडाणा | ४० | ६० | २० | क |
| २६. | राजर्षी शाहु महाराज कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, मु.पो.सडक अर्जुनी, जि.गोदिया | ४० | ६० | २० | ड |
| | **वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापठ, परभणी** | | | | |
| २७. | एमजीएम कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गांधेली, औरंगाबाद. | ८० | १०० | २० | अ |
| २८. | एस.डी.एम.व्ही. मंडळ कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गेवराई तांडा, पैठण रोड, औरंगाबाद | ८० | १०० | २० | ब |
| २९. | महात्मा गांधी कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, पोखर्णी पो. लिंबगांव (रेल्वे), नांदेड पूर्णा रोड, जि नांदेड | ८० | १०० | २० | ब |
| ३०. | कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, हट्टा ता.बसमत जि.हिंगोली | ८० | १०० | २० | क |
| ३१. | आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, बीड | ८० | १०० | २० | ड |
| ३२. | कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, प्लॉट क्र.पी-७, ॲडीशनल एमआयडीसी, हरंगुळ रेल्वे स्टेशन, बार्शी रोड, लातूर | ८० | १२० | ४० | ड |
| | **डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली** | | | | |
| ३३. | शरदचंद्रजी पवार उद्यानविद्या महाविद्यालय, खरवते दहिवली, (सावर्डे) ता.चिपळूण जि.रत्नागिरी | ८० | १२० | ४० | अ |
| ३४. | उद्यानविद्या महाविद्यालय, सांगुळवाडी ता.वैभववाडी जि.सिंधुदुर्ग | ४० | ६० | २० | ब |
| ३५. | उद्यानविद्या महाविद्यालय, सरळगाव ता.मुरबाड जि.ठाणे | ४० | ६० | २० | क |

admn23-24

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नाव व पत्ता | प्रवेश क्षमता | वाढीव प्रवेश क्षमता | होणारी वाढ | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|
| ३६. | कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, खरवते दाहिवली, ता.चिपळूण जि.रत्नागिरी. | ४० | ५० | १० | ब |
| ३७. | कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, सांगुळवाडी ता.वैभववाडी जि.सिंधुदुर्ग | ४० | ५० | १० | क |
| ३८. | कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, सरळगांव, ता.मुरबाड जि. ठाणे | ४० | ५० | १० | ब |
| ३९. | कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, आचळोली, ता.महाड जि.रायगड | ४० | ५० | १० | क |

(रावसाहेब भागडे)
**महासंचालक**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**पुणे**